राज्यातील खरीप- २०१८ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः- १० जूलै, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक :- ३१.१०.२०१८
२) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक :- २५.०१.२०१९
३) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१०/म-११, दिनांक :- २९.०१.२०१९
४) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक :- १४.०२.२०१९
५) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७, दिनांक :- २१.०२.२०१९

प्रस्तावना :-

खरीप हंगाम २०१८ मध्ये महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०१८ अन्वये राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. दुष्काळ घोषित केलेल्या या १५१ तालुक्यांतील बाधित शेतक-यांना कृषि विषयक मदत वाटपाकरिता संदर्भ क्र. २ येथील दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच तीन टप्प्यामध्ये सर्व जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

औरंगाबाद विभागास एकूण रुपये १७७२.७१ कोटी इतकी रक्कम रूपये वितरीत करण्यात आली आहे. या निधीपैकी औरंगाबाद विभागात रूपये १७७२.७० कोटी इतके अनुदान ३१ मार्च २०१९ पर्यंत वाटप करण्यात आले आहे. आता विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी केलेल्या मागणीनुसार दुष्काळ अनुदान वाटपासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनाक २८ जून, २०१९ च्या बैठकीत मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता.

तसेच खरीप हंगाम २०१८ मध्ये दुष्काळ घोषित केलेल्या नागपूर जिल्ह्यातील काटोल, नरखेड, कळमेश्वर या तीन तालुक्यांतील गावामधील बहुवार्षिक पिक नुकसानीची माहिती निरंक कळविली होती. नागपूर जिल्हयातील काटोल, नरखेड व कळमेश्वर या दुष्काळग्रस्त तालुक्यातील १८५९१ हेक्टर आर क्षेत्रावरील बहुवार्षिक पिकांना मदत वितरीत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांनी केलेली विनंती विचारात घेवून सदर प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २८ जून २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनाक २८ जून, २०१९ च्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या उपरोक्त दोनही प्रस्तावास मंत्रिमंडळ उपसमितीने मंजूरी दिली असून त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना रूपये ३९०,२५,३४,००० (अक्षरी रूपये तीनशे नव्वद कोटी पंचवीस लाख चौतीस हजार फक्त) व नागपूर जिल्ह्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांना रूपये ३३,४६,३८,०००/- (अक्षरी रूपये तेहतीस कोटी शेहचाळीस लाखा अडतीस हजार फक्त) असा एकुण रूपये ४२३,७१,७२,०००/- (अक्षरी रूपये चारशे तेवीस कोटी एकाहत्तर लाख बहातर हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचारीधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील खरीप हंगाम २०१८ मध्ये संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या औरंगाबाद विभागातील व नागपूर जिल्ह्यातील शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीसाच्या अनुषंगाने मदत वाटप करण्यासाठी निविष्ठा अनुदानाकरीता विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना रूपये ३९०,२५,३४,००० (अक्षरी रूपये तीनशे नव्वद कोटी पंचवीस लाख चौतीस हजार फक्त) व नागपूर जिल्ह्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांना रूपये ३३,४६,३८,०००/- (अक्षरी रूपये तेहतीस कोटी शेहचाळीस लाख अडतीस हजार फक्त) असा एकुण रूपये ४२३,७१,७२,०००/- (अक्षरी रूपये चारशे तेवीस कोटी एकाहत्तर लाख बहातर हजार फक्त) इतका अतिरिक्त निधी सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार उपलब्ध करून देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार सदर रकमेचे वाटप बाधित शेतक-यांना करावे.

३. या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष - २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१, अवर्षण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४३४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सदरहु आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरीत करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१०१५१२५२८२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.10 15:22:41 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव

२. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. सर्व लोकसभा सदस्य / राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४. सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य.
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
६. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग यांचे स्वीय सहायक,
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसुल व वन विभाग
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०. सचिव (मदत व पुनर्वसन)
११. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
१२. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. महालेखापाल -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१४. महालेखापाल -१ /२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व विभागीय कृषि सह संचालक
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२०. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२. सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
२३. वित्त विभाग, व्यय -९ / अर्थसंकल्प कक्ष / अर्थोपाय कक्ष), मंत्रालय , मुंबई.
२४. महसुल व वन विभाग, (म-७ / म११ / म-३), मंत्रालय, मुंबई-३२
२५. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी कृषि व पदुविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२६. निवड नस्ती , म-७ कार्यासन

शासन निर्णय क्रमांकः- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१९/म-७ ,दिनांक १० जुलै, २०१९ चे सहपत्र.

अ.क्र.	**विभाग**	**जिल्हा**	**वितरीत करण्याची रक्कम**
१	औरंगाबाद	औरंगाबाद	६४३०४११००
२		जालना	१०३०७८४६००
३		बीड	११८३३५५१००
४		लातूर	४४४०८७००
५		उस्मानाबाद	३०४३११०००
६		नांदेड	२३९०६५२००
७		परभणी	२१५०२००००
८		हिंगोली	२४२५४८३००
	एकुण औरंगाबाद विभाग		३९०२५३४०००
९	नागपूर	नागपूर	३३४६३८०००
	एकुण वितरीत करावयाची रक्कम		**४२३७१७२०००**